**<u>नियमित दिवाणी दावा क्र.५८२/२०२४</u>**

# <u>नि.क्र.१२ खालील आदेश</u>

प्रस्तुत अर्जाद्वारे कैफियत दाखल करण्यासाठी परवानगी मिळण्याची प्रतिवादी क्र.१ ने विनंती केली आहे. पुरेशी संधी असूनही वादीने त्यावर म्हणणे दाखल केले नाही. अर्ज व अभिलेख पाहिला. प्रतिवादी क्र.१ तर्फे युक्तिवाद ऐकला.

निश्चितच प्रतिवादी क्र.१ यास कैफियत दाखल करण्यासाठी पुरेसा वेळ व संधी होती. परंतु, सदरवेळी त्यांनी कैफियत दाखल केली नाही. केवळ त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ला कैफियत दाखल करण्यासाची संधी नाकारता येणार नाही. अशी संधी दिल्यास वादीचे काहीही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा व उभय पक्षकारामध्ये खऱ्या वादाचा निपटारा गुणदोषावर होण्यास मदतच होणार आहे. त्याच प्रमाणे अशी संधी दिल्यास प्रकरण बाहुल्य रोखण्यास सुध्दा मदत होणार आहे. सबब, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. प्रतिवादी क्र.१ ने कैफियत दाखल करण्यास विलंब केला आहे. त्याबाबत प्रतिवादी क्र.१ वर कॉस्ट लावणे न्यायोचीत होईल. त्याप्रमाणे अर्ज मंजूर करण्यात येतो. प्रतिवादी क्र.१ ने विधीसेवा यांना खर्च रु.२००/- देण्याच्या अटीवर कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित.)

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2025.11.03 11:46:39 +0530

**(के. ए. यादव)**
२ रे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, उदगीर

उदगीर
दि.०१/११/२०२५